**प्रेसनोट** दिनांक २३/०१/२०२५

**उप अभियंता, बांधकाम विभाग, उपविभाग श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड (वर्ग १) यास लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंध रायगड विभागाने घेतले ताब्यात.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंध विभाग | रायगड. |
| ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक | श्रीवर्धन पोलीस ठाणे, दैनंदिनी नोंद क्र.२४/२५, दि. २३/०१/२५ वेळ १८-१९ वाजता. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.प्रविण पंढरीनाथ मोरे, वय-५१ वर्षे, उप अभियंता(बांधकाम), रा.जि.प. उपविभाग श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि.रायगड (वर्ग-१) |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १३,०००/- रूपये, पहिला हप्ता रू.१०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रूपये |
| थोडक्यात हकिगत | यांतील तक्रारदार यांचे मौजे भावे बौध्दवाडी-वडवली, ता.श्रीवर्धन येथील महिला समाज घर बांधकामाचे एकुण रू. ७,००,०००/- चे कंत्राट सन २०२३-२४ या कालावधीत मिळाले होते. सदर काम पूर्ण झाल्यानंतर तक्रारदार यांना समाजकल्याण अलिबाग खात्याकडून रू. १,४०,०००/- रक्कमेचे बिल तक्रारदार यांस अदा झालेले आहे. सदर मंजूर झालेल्या बिलाची टक्केवारी म्हणून रू. २,५००/- व उर्वरिता राहिलेले रू. ५,६०,०००/- रक्कमेचे बिल कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद यांचे कार्यालयात पाठविण्याच्या मोबदल्यात व मंजूर करण्यास मदत करण्यासाठी १०,५००/- अशी एकूण रक्कम रू.१३,०००/- रकमेची लाचेची मागणी करीत असलेबाबत लोकसेवकर श्री.प्रविण पंढरीनाथ मोरे, वय-५१ वर्षे, उप अभियंता(बांधकाम), रा.जि.प. उपविभाग श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन जि.रायगड(वर्ग-१) हे यांच्याविरूध्द तक्रार प्राप्त झाली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणीच्या वेळी दि. २३/०१/२०२५ रोजी लोकसेवक श्री.प्रविण मोरे यांनी तक्रारदार यांचेकडे स्वत:च्या श्रीवर्धन येथील कार्यालयात १३,०००/- रूपये लाचेची मागणी करून, त्यापैकी पहिला हप्ता रक्कम रू.१०,०००/- स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीअंती निष्पन्न झाले.<br>त्यानुसार दिनांक २३/०१/२०२५ रोजी उप अभियंता(बांधकाम), रा.जि.प. उपविभाग श्रीवर्धन येथील कार्यालयात सापळा आयोजित केला असता, लोकसेवक प्रविण मोरे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रू.१०,०००/- पंच साक्षीदार यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडून स्वीकारली असता १४.४० वाजता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेवकर यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| मार्गदर्शक अधिकारी | १) मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे<br>२) मा.श्री.संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे<br>३) मा.श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्र ठाणे |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. शशीकांत पाडावे, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग |
| सापळा व तपासी अधिकारी | श्री. निशांत धनवडे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग |
| सापळा पथक | १) श्री. निशांत धनवडे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग<br>२) श्री. संतोष भिसे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग<br>३) श्री. विनोद जाधव, सहा. फौजदार, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग<br>४) श्री. सचिन आटपाडकर, पो.ह. २२७१, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड, अलिबाग |

लाचलूचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्याचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर ठाणे (प) ४०० ०६१.
संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रारॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्सॲप क्रमांक :— ९९३०९९७७००
ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०२१४१ — २२२३३१
टोल फ्री क्रमांक :— १०६४
मोबाईल क्र. :— ९८७०३३२२९१ ( शशीकांत पाडावे ), ८१०८३५५४८८ ( निशांत धनवडे), ८६५२०९००७८( संतोष भिसे )
ईमेलआयडी :— dyspacbraigad@gmail.com

(शशीकांत पाडावे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग.